प्रकरण चौथे

# संतोष पद्माकर पवार यांच्या कवितांची आविष्कारसूत्रे

प्रकरण चौथे

# संतोष पद्माकर पवार यांच्या कवितांची आविष्कारसूत्रे

## ४.१) प्रस्तावना:-

प्रस्तुत प्रकरणामध्ये संतोष पद्माकर पवार यांच्या काव्यलेखनाच्या आविष्कारतंत्राचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यांची कविता कोणकोणत्या छंदात मांडली आहे. याचेही वेगळेपण येथे नमूद केले आहे. संतोष पवार यांनी काव्यनिर्मितीत एकच आविष्कार सूत्र स्वीकारलेले नाही. अनेक सूत्रे त्यांच्या कवितेत कशी येतात याचा अभ्यास काव्यसंग्रहातील कवितांच्या आशयाचा अभ्यास करुन शोधण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

## ४.२) बोली भाषेचा वापर :-

संतोष पद्माकर पवार हे १९९० नंतरचे एक महत्त्वाचे कवी आहेत. त्यांचे अनुभवविश्व हे नगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील असल्यामुळे अस्सल ग्रामीण बोलीचा त्यांच्या कवितेत वापर आलेला आहे. 'पिढीपेस्तर प्यादेमात' या कवितेतून त्यांच्या ग्रामीण शैलीचा अनुभव पाहायला मिळतो. तो असा,

"आभाळ दादा भरुन जाय गावच्या गाव कोरडं ऱ्हाय
नद्याच्या नद्या कोरड्या ठाक बेगमी वाळू शहरा जाय
आमचा माल जगच खाय गावाची गल्ली भुकीच हाय
आम्हाला वाली कुनीच.. नाय" (पृ.क्र. ३८)

"राबती साऱ्या आया नि बाया शेताच्या नादी गेलेल्या वाया
चिखल माती जित्राब शेन्या घेऊन जाय तोंडाची रया
उमर सारी कलून जाय राबता हात राबत ऱ्हाय
आम्हाला वाली कुनीच नाय" (पृ.क्र.३८)

येथे कवीची बोली ही सामान्य कष्टकऱ्यांच्या तोंडची वाटते. म्हणूनच त्यांच्या ग्रामीण बोलीविषयी लीना केदार म्हणतात, "ह्या संग्रहातील बहुतांश कविता या ग्रामीण

बोलीतल्या आहेत. त्यात स्त्रियांच्या तोंडची बोली, कष्टकऱ्यांची बोली, त्या त्या जातीनिहाय बोलीचा वेगळा संदर्भ या व्यतिरिक्त खास घडवलेल्या ग्रामीण प्रतिमा, निराळ्या उपमा, ग्रामीण बोलीतील नादमय वाक्यांशांची लकब अशा अनेक गोष्टी दिसतात." (केदार, २०१३, ४) लीना केदार यांचे निरीक्षण योग्यच आहे. पवार यांच्या कवितेतून अनेक ग्रामीण शब्द तेथील जीवनकळा घेऊन येतात. उदा. वाकळ, सुपल्या, फासोटी, ईभ्रत, बारव, लुगडं, इझेल, मुसक्या, डगळंग मचळंग, बक्कळ, भाकड, शिंदळ, धुळवड, झडती, कुणबी, पागोटं, पहिलटकरीण असे अनेक अस्सल नगरी ग्रामीण शब्द पवार यांच्या कवितेतून आविष्कृत होतात. या शब्दामुळेच त्यांच्या कवितेतील आशय मोजक्या शब्दात येतो.

त्यांच्या कवितेतील मांडणीमध्ये वेगळेपणा जाणवतो. म्हणूनच त्यांच्या कवितेविषयी दिलीप पुरुषोत्तम चित्रे म्हणतात की, "संतोष पवार यांची कविता ऐकत असताना आपल्यापैकी अनेकांना - ज्यांना मराठी काव्याचा सगळा इतिहास माहिती आहे, त्यांना तिच्यामध्ये अनेक प्रकारचे ध्वनी आणि प्रतिध्वनी ऐकू आले असतील. त्या कवितेचे जर कोणी छंदशास्त्रीय विश्लेषण किवा चिकित्सा केली तर असे दिसेल की, तिच्यामध्ये निरुपण होतं. तिच्यामध्ये वारकरी कीर्तन होतं आणि हरदासी किर्तनही होतं. तिच्यामध्ये कथा होत्या, लोककथा होत्या, त्या लोककथांच्या पद्धतीन सांगितल्या होत्या. तिच्यामध्ये उर्दु मुशायरी होता, तिच्यामध्ये बाजारात आणि रस्त्यात ऐकू येणाऱ्या घोषणा होत्या आणि या सगळ्यांच्या ज्या संमिश्र लयी आहेत. एखाद्या प्रचंड भित्तीचित्रामध्ये किंवा म्यूरलमध्ये व्यक्त वाहावे, त्याप्रमाणे हे सगळे भाषिक तपशील होते. मराठीला गेल्या वीस वर्षात बसलेला प्रत्येक झटका या कवितेमध्ये कुठे ना कुठे दिसेल." (चित्रे,२००३,मलपृष्ठ,) यांचे निरीक्षण योग्यच आहे. संतोष पवार यांच्या कवितेतील छंदशास्त्रीय विश्लेषण करता मराठी साहित्यातील ओवी, अभंग, कीर्तन, लोककथा, लोकगीते, आख्यायिका, उर्दू मुशायर, घोषणा अशा संमिश्र स्वरुपात त्यांची कविता आविष्कृत होते.

संतोष पवार यांनी ग्रामीण बोलीतून कविता मांडली असली तरी त्यांच्या कवितेमध्ये प्रयोगशीलता आहे. एकूणच १९९० नंतरच्या काव्यलेखनातील वेगळी वैशिष्ट्ये जपणारी शैली त्यांनी मांडली आहे. वेळोवेळी प्रतीक-प्रतिमा, संवादात्मकता, लोककथा, अन्यभाषिक शब्दांचा वापर, यमकांची जुळवाजुळव इ. वाङ्मयीन विशेष घेऊन पवार यांची कविता आविष्कृत होते.

### ४.३) लोकसंवादात्मक कवितेची मांडणी :-

संतोष पवार यांची कविता ही रसिकांशी थेट संवाद साधत असते. त्यांची कविता सामाजिक प्रश्नांचा वेध घेत असल्यामुळे हे संवाद कधी स्वत:शी तर कधी कवितेतील दोन पात्राशी संवाद होताना दिसतात. त्यामुळेच त्यांची कविता रसिकांना सामाजिक प्रश्न नुसते विचारत नाही तर महात्मा फुले यांच्या कवितेप्रमाणे व्यवस्थेला जाब विचारणारी वाटते. *(केदार, २०१३,५)* म्हणूनच केशव मेश्राम या कवितेविषयी म्हणतात. "कहाणी ढंगाची अलवार मांडणी करीत महात्म्ये कथन करण्याची लकब, संबेधनातून अजागर होणारा प्रकट संवाद आणि प्रश्नमांडणी व उकल करण्याचा घाट, ह्या कवीने आत्मसात केलेला आहे." *(मेश्राम, २००५. ४१)*

पवार यांच्या कवितेतील संवाद हे दोन पात्रातील संवादात्मक स्वरुपात येतात. 'सासरला निघताना' या कवितेत सासरी जाणारी मुलगी व आई यांच्यातील संवाद तर 'बोल सये' या कवितेत दोन सासुरवाशीण स्त्रिया एकमेकींच्या व्यथा वेदना समजावून घेताना संवाद घडतो. तो असा,

"तुझ्या हातावर डाग कशाचा ग बाई ?
... तुझ्या संगतीनं इथं मी मातीत बाई
बोल सये, बोल अगं मनातलं बोल
... बारवेचा तळ सांग किती किती खोल-".

(पिढीपेस्तर प्यादेमात पृ.क्र. ९)

कवी सासुरवाशीण स्त्रियांच्या जगण्यातील वास्तव मांडतात. तसेच पुढे 'पहिलटकरीन', 'गं बाई रोजच्या घागरी', 'साऱ्या जिंदगीचा झाडा', तसेच 'माय होतीस तसली' याकवितेत निवेदक आत्मसंवाद साधताना दिसतो.

संतोष पवार यांची कविता फक्त संवाद साधत नाही तर समाजव्यवस्थेला प्रश्न विचारते. व या प्रश्नांच्या उत्तराची अपेक्षा करते. म्हणूनच कवी 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' या कवितेत म्हणतात.

"दुर्गंधीला कुठले लावणार झाकण ?
अनाचाराच्या लोंढ्याला कुठले लोटाल दार ?
कसल्या लावाल कड्या वाऱ्याला ?
कुठल्या कुलुपात नांदणार आहे प्रकाश ?"

*(भ्रमिष्टाचा जाहीरनामा, पृ.क्र.३७)*

असे अनेक प्रश्न कवी थेट रसिकांना विचारतात. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रश्नावर लोकांना विचार करण्यास पवारांची कविता प्रवृत्त करते. हेच पवार यांच्या कवितेचे वेगळेपण आहे.

**४.४) लोक कथनात्मक कवितेची मांडणी :-**

संतोष पवार यांच्या कवितेतील लोककथा, पौराणिक कथा ज्या पद्धतीने सांगितल्या जातात. त्या पद्धतीने त्यांची कविता ते व्यक्त करतात. त्यांच्या कवितेतील गेयता व लय त्यांनी मौखिक साहित्यातून घेतली आहे. त्यामुेच त्यांची कविता श्रवणीय व वाचनीय वाटते. म्हणूनच 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' या कवितेत ते पौराणिक कथा सांगितल्याप्रमाणे कविता व्यक्त करतात.

"तर एका गावी
एक गरीब ब्राह्मण राहात होता
त्याच्याजवळ एक गाय होती

ती त्याच्या कुटुंबाची माय होती"

*(श्रमिष्टाचा जाहीरनामा, पृ.क्र.२)*

येथे आख्यायिका कथन केल्यासारखे वाटते. कविता अभिव्यक्त करण्याची पवार यांची शैली एक वेगळेपणा जपणारी आहे. मौखिक लोकसाहित्यातील शैलीचा कविता व्यक्त करताना ते वापर करीत असले तरी त्यांच्या कवितेतील आशय हा समकालीन व्यवस्थेवर भाष्य करतो. काही कवितांतून त्यांनी लोकगीतातील बाज स्वीकारला आहे. 'पिढीपेस्तर प्यादेमात' या संग्रहातील 'झडती देणारांची' या कवितेत कवी लोककथांची सुरुवात जशी होते. त्या मांडणीत कवी व्यक्त करतात.

"चक चहाडा
बैल बोहाडा
बैल गेला पौणगडा
पौणगडाहून आणली माती
भिजवली तं झाली शेती
शेती पिकली खंडीभर
कुणब्याच्या जीवाची हाल अलाबला
हरबला ऽऽहर ऽमहादेव ऽ"

*(पिढीपेस्तर प्यादेमात, पृ.क्र.१)*

लोककथा, लोकगीते किंवा पौराणातील कथा हे एक वेगळे आविष्कार सूत्रांतून पवार यांनी कविता मांडली आहे. एकूणच समाजातील ज्वलंत प्रश्न मांडताना पवार यांनी लोकसाहित्यातील मांडणीचा आधार घेतला आहे. तो एक वेगळेपणा जपणारा आहे.

**४.५) अन्य भाषिक शब्दांचा वापर :-**

जागतिकिकरणामुळे सर्व जग एकत्र आले आहे. त्याचाच परिणाम म्हणजे मराठी कवितेवरती इतर भाषांचा प्रभाव पडला आहे. पवार यांच्या कवितेतून इंग्रजी, हिंदी, मराठी

अशा संमिश्र भाषांतील शब्दांचा वापर आलेला आहे. त्यामुळे इंग्रजीतील नेहमी वापरात येणारे शब्द त्यांच्या कवितेतून येतात.

"इथल्या बालकल्याणासाठी चालवायच्यात
गँगस्टारच्या सैनिकशाळा .............
        वृद्धांच्या कानडी सोलून काढायचीय चरबी
        साऱ्यांची हाडके फोडून कुठून बनवायचीत दातवणं
एक्सपोर्ट करायचाय भेजाफ्राय
कलावंताच्या ओरिजनला फिंगरचिप्स
धाडायच्या आहेत......... " *(भ्रमिष्टाचा जाहीरनाम - पृ.२०)*

"तुमच्या लाईफ प्रोग्रॉम
लाइव्ह टेलीकास्ट करतील
जगाच्या पार ..........
मग बसा हात चोळत...... "

*(भ्रमिष्टाचा जाहीरनामा - पृ.क्र. २२ -२३)*

ग्रामीण भागात आज अनेक इंग्रजी शब्दांचा वापर प्रत्येक ठिकाणी होत असतो. त्यामुळे पवारांच्या कवितेमधूनही अनेक इंग्रजी शब्द येतात. उदा. ट्रॅफिक, कॅन्ड, मेरिट, गर्लफ्रेंड, शेड्युल, इंटर - नॅशनलाइझ्ड, मॉडेल, रोटेशन, हायब्रीड, टेलर, फार्मर, इंडस्ट्रीवाले, प्रायोरिटी, युनिटी, पेंडींग, पार्टी, मार्केटिंग इ. इंग्रजी शब्दांचा वापर कवी चपखलपणे आपल्या कवितेत करतात. हिंदी भाषेचा प्रभाव पवारांच्या कवितेवरती मोठ्या प्रमाणात जाणवतो. उदा.

"छिपकलिको मारना आसान है
पिछेकी दिवार गिरनेका डर
है मगर -" *(पिढीपेस्तर प्यादेमात, पृ.क्र.७२)*

"दहशत गर्दी में यारों"

"रियायती आये हुये हैं

तरक्की कीराह मैं ये

खुदही सोये हुवे है।" *(भ्रमिष्टाचा जाहीरनामा- पृ.क्र. ४६)*

जागतिकीकरणामुळे एकूणच मराठी वाङ्मयावरती अनेक भिन्न भाषांचा प्रभाव पडला आहे. त्यामुळेच ग्रामीण भागातील राहणाऱ्या लोकांच्या बोलीत इंग्रजी, हिंदी, फार्सी भाषांचा प्रभाव जाणवतो. त्यामुळेच पवारांच्या कवितेवरती या संमिश्र भाषांचा प्रभाव जाणवतो.

**४.६) उपरोधिक शैली :-**

कवी संतोष पवार यांच्या कवितेतील आशय सामाजिक असल्यामुळे समाजातील अनेक समस्येवरती ते उपरोधिक शैलीत परखड मत व्यक्त करतात.

"अंधारात दगड फेकून

ढगामधी गोळ्या झाडून

देशप्रेम सिद्ध होत नसतं कधी

न्हाणीघरात पडून मेलेल्यांना

शहीद म्हणता येत नसतं कधी"

*(भ्रमिष्टाचा जाहीरनामा, पृक्र.१९)*

"तुमच्या गांडो मनाला जर सारे जग

सरळच चाललेय असे

वाटत असेल लवकर खड्ड्यात जा

नाहीतर बुजवून घ्या स्वत:ला खाली"

*(भ्रमिष्टाचा जाहीरनामा, पृ. क्र.१)*

समाजातील नेमक्या प्रश्नावर कवी उपरोधिक शैलीत भाष्य करतात. तसेच 'पिढीपेस्तर प्यादेमात' या संग्रहातील 'कृषी प्रदर्शनात अल्पभूधारक', 'चोर एक दंतकथा',

'जेंव्हा शेतीची एक फॅशन बनती' इ. कवितांमधून कवींनी समाजातील नेमक्या प्रश्नावर उपहासात्मक काव्यलेखन केले आहे.

**४.७) व्यक्तिवर्णनात्मक कविता :-**

'पुंजा केरू साळवे', 'एक ग्रामपंचायत शिपाई', 'गोरोबा काकांची एक नवी आख्यायिका', 'क्रांतिसिंह' या तिन्ही कवितेतून कविंनी व्यक्तिच्या स्वभावाचे वर्णन केले आहे. पुंजा करू साळवे हा तर ग्रामपंचातीतील शिपाई पण त्याच्या कामाचे वर्णन करताना कवी म्हणतात.

"कुणाच्या संडासाचे चोकअप असे काढितो राजा
की-बंद अक्कल चालू व्हावी
वाटेत मेलेल्या कुत्र्या - डुकरांना तू फोडतोस पाय
त्यांना शिकवितो चालायला
दुसऱ्याच्या बायकांशी बोलायला
कितीक पण झुरत्यात
पण तुझ्याशी पुंजा .......
न्हाऊन बोलत्यात साऱ्याच घरच्या साऱ्या बायका
नळाला पाणी कधी सुटंल म्हणून। "

*(पिढीपेस्तर प्यादेमात, पृ. क्र. ६७)*

प्रत्येक गावातील ग्रामपंचायतीचा शिपाई याच्यापेक्षा वेगळे जीवन जगत नाही. पुंजाच्या मार्फत कवींनी महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतीच्या शिपायांची जगण्याची व्यथा मांडली आहे. "गोरोबा काकांची एक नवी - आख्यायिका" या कवितेतून गोरा कुंभार यांच्या अध्यात्म विचारांची प्रचिती करुन देतात. तर 'क्रांतिसिंह' या कवितेतून क्रांतिसिंह नाना पाटील यांनी शेतकऱ्या विरूद्ध पुकारलेल्या लढ्याचे वर्णन कवी करतात. क्रांतिसिंहांनी दिलेल्या घोषण, उद्घाषणांचे पडसाद कवी येथे व्यक्त करतात.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

"क्रांतिसिंहाची गर्जना झाली

गाजून गेली डोंगरजाळी

उन्हात पाण्याचा मटकारे

जुलूमाचा दिला झटकारे -"

*(पिढीपेस्तर प्यादेमात, प. क्र. १४४)*

कवी पवार यांच्या कवितेतील वेगळेपण येथे व्यक्त होते. व्यक्तिच्या स्वभावाचे व कार्याचे वर्णन कवी कुशलतेने मांडतात. व्यक्तिचित्रणात्मक कवितेत पवार यांनी यामुळे मोलाची भर घातली आहे.

**४.८) गद्यात्मक शैली :-**

कवी संतोष पवार यांच्या 'भ्रमिष्टांचा जाहिरनामा' व 'पिढीपेस्तर प्यादेमात' या दोन्ही काव्यसंग्रहाच्या लेखणीत प्रयोगशीलता दिसते. या काव्यसंग्रहातून त्यांनी गद्यात्मक मांडणी केली आहे. तसेच गद्यातील 'अर्ज', 'दस्त', 'जाहिरनिवेदन', 'मुलाखत', 'वर्तमानपत्रातील बातमी' तसेच 'दवंडी' अशा विविध गद्यापकरातून त्यांची कविता साकारते.

'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्यसंग्रहातील 'कारू-नारू अर्जदस्त' या कवितेतून ते अर्जाच्या स्वरुपातून बारा-बलुतेदारांचे दुःख व्यक्त करतात. त्यांनी हा अर्ज समस्त 'कारू-नारू' गावचे पाटील यांना करताना अशी मांडणी केली आहे.

"आम्ही समस्त कारू नारू, पाटलांकडे अर्ज करतो की,

मेहबानांच्या मर्जीनं आम्ही आजवर गावात राहिलो आता

आम्ही गावात राहावं अशी गत उरली नाही आम्ही

आमच्या हिकमतीवर गावात राहिलो होतो

......... तुमच्याच पायाशी पडलेले

आम्ही कारू नारू -

*(पिढीपेस्तर प्यादेमात, पृ.क्र. ८७)*

गावातील कारू नारू यांच्या जगण्यातील व्यथा ते येथे व्यक्त करतात. तर पुढे याच काव्यसंग्रहात 'काळीतून मुक्ती घेतल्याची कहाणी' या कवितेतून जाहिर निवेदनाच्या शैलीत शेतकऱ्याची करूण कहाणी ते पुढील शब्दात मांडतात.

> विकणे
>
> बारमाही बागायत चार एकर (पाटपाण्याची सोय) सायफन हजार चौ. फुट स्लॅबचे घर, गोठा पोल्ट्रीची शेड कांदा चाळ सर्व अवजारासह त्वरीत विकणे आहे. संपर्क साधा ..... मुक्ताबा गहिना सुतार गावठीचा मळा बस्तनपूर.
>
> टीप - कृपया सौद्यासाठी दलाल आणू नये. फ्रेश-तलाटी उतारे तयार, निष्कर्जी (व्यवहार होताच) इतर बोजा उतरवून देऊ. त्वरा करा मालक घाईत आहेत. *(पिढीपेस्तर प्यादेमात पृ.क्र. १५०)*

तर पुढे याच कवितेतून पवार 'मुलाखत' मांडतात. ही मुलाखत एक पीडित शेतकरी व खरेदीदार यांच्यातील संवादातून 'सौदा १ ', 'सौदा २ ' कवी मांडतात.

सौदा १

- किती वर्षापूर्वी तुम्ही घेतली ही शेती ?
  - पूर्वापार चालत आलीय.
- का बरे विकायला काढली ?
  - मुलाला शहरात नोकरी लागली.
- कुठे ?
  - पुण्याला कंपनीत.

*(पिढीपेस्तर प्यादेमात पृ.क्र. १५०)*

इत्यादी संवादातून कवी शेतकऱ्यांचा साधेभाळेपणा व्यक्त करतात. तर खरेदीदारांचे व्यावहारिक प्रश्न कवी मांडतात.

पुढे याच शेतकऱ्याची दुर्दशा होते. त्याला तोतया बिल्डरकडून फसविले जाते. याचे स्वरुप कवी 'बातमी' या सदराखाली मांडतात. व या कवितेत शेवटी ते गावातील 'दवंडी' ज्याप्रमाणे असते. त्या स्वरुपात ग्रामसेवकांच्या रजिस्टरचा उताऱ्याच्या स्वरुपात याच शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे स्वरुप मांडतात.

"दवंडी रजिस्ट्रारचा उतारा
मौजे बस्तनपूर
सर्व ग्रामस्थांना कळविण्यात येते की,
आपल्या गावच्या ओढ्याला एक पुरूष जातीचे
अनोळखी प्रेत सापडले आहे असून त्याबाबत कुणाला काही
माहिती असल्यास त्याने तालुका पोलीस स्टेशनला
संपर्क साधावा. ही दवंडी दिली असे.

सही XXX
ग्रामसेवक बस्तनपूर

*(पिढीपेस्तर प्यादेमात पृ.क्र. १५५)*

शेतकऱ्याची ही करूण कहाणी गद्यशैलीत मांडल्यामुळे प्रभावी वाटते. कवी ग्रामसेवक होते. त्यातील हा अनुभव कदाचित सत्य असावा.

**४.९) ओवी/अभंग, वृत्तांचा वापर :-**

कवी संतोष पवार यांच्या कवितेवर संतसाहित्याचा मोठा प्रभाव जाणवतो. त्यामुळे त्यांची कविता ओवी, अभंग स्वरुपात आढळते.

"विध्वंसास मन । धावतेच पुढे
दुसऱ्याचे मढे । काढण्याला

अशांचेच मढे । एकदा पाडूनी
करावी पेरणी । सत्यासाठी
सत्याच्या झाडाला । सत्याचेच कोंब
सत्याचीच बोंब । चहुकडे"

- *(भ्रमिष्टाचा जाहीरनामा पृ.क्र. २८)*

कवी यातून सत्याची पाठराखण करतात. परंतु सर्वत्र त्याचीच वाणवा निर्माण झाल्याची खंतही व्यक्त करताना दिसतात.

"उंदिरास दिले पद । पद सेनापती।
बाकी शेणापती । ठरविले
हत्तीलागी नाही । मुंगीचेही काम।
त्यासही हराम । ठरविले
सिंहासाठी दिला । गवताचा खाना
कापू त्यांच्या माना । ठरविले ।"

- *(भ्रमिष्टाचा जाहीरनामा पृ.क्र. ३५)*

समाजातील दैन्य, दंभ यावरती कवी अभंगाच्या शैलीतून विचार मांडतात. एकूणच पवारांच्या कवितेतील सामाजिक आशय पाहता त्यांचा पिंड संत साहित्यावरती पोसलेला जाणवतो. त्यांनी संतांच्या ओवी, अभंग रचनेचा आधार घेतला आहेच पण संतांचा सामाजिक विचार ते परखड भाषेत व्यक्त करतात.

**४.१०) यमक :-**

कवी संतोष पवार यांची कविता मुळात गेय असल्यामुळे त्या कवितेत यमक रचनेचा वापर केला आहे. कवी यमक साधताना 'अ' कारान्त, 'आ' करान्त, 'ई' कारान्त तसेच 'ऐ' कारान्त यमक मांडणी केली आहे.

**४.१०.१) 'अ' कारान्त यमक :-**

| | |
|---|---|
| हाय - नाय | विचार - विकार |
| गत - पत | संचित - वंचित |
| शिकार - भिकार | डंगळंग - मचळंग |
| छांद - बंद | शाप - साप |
| गाय - माय | |

**४.१०.२) 'आ' कारान्त यमक :-**

| | |
|---|---|
| काळा - मोळा | मारुया - करुया |
| घ्यावा - द्यावा | दणका - मणका |
| भांडण्याला - कांडण्याला | जळवा - कळवा |
| जगाला - घराला | दणाणा - भयाणा |
| भूमिका - नायिका | |

**४.१०.३) 'ई' कारान्त यमक :-**

| | |
|---|---|
| पाणी - गाणी | भिती - राती |
| रंगांनी - अंगांनी | सतारी - एकतारी |
| पती - सती | माती - खाती |
| नक्षी - पक्षी | चिंधी - मिंधी |
| अक्रांती - क्रांती | भाकरी - चाकरी |

**४.१०.४) 'ऐ' कारान्त यमक :-**

| | |
|---|---|
| मुक्याने - उखाणे | सांगे - टांगे |
| मढे - चुडे | तोंडे - सोंडे |
| उरले - फिरले | जातीचे - मातीचे |

पवारांच्या कवितेत अनेक वेळेला यमक येते. काही वेळेला तीन तीन चरणात ते यमक शब्दांचा वापर करतात. उदा. छंद - स्कंद - बंद, मेळे - चेळे - केळे इत्यादी. त्याचप्रमाणे कवी गेयता टिकविण्यासाठी काही वेळेला यमक रचनसाठी शब्दांची ओढाताण

करताना दिसतात. अर्थात त्यामुळे कवितेतील आशयात बदल होत नाही. हे येथे सूचित करावे वाटते.

**४.११) वाक्यप्रचार / म्हणींचा वापर :-**

कवींनी काव्यलेखन करताना सामाजिक आशय व्यक्त केला आहे. त्यामुळे ग्रामीण बोलीतील वाक्यप्रचार व म्हणी यांचा वापर त्यांच्या कवितांतून झाला असल्याचे दिसून येते. 'पिढीपेस्तर प्यादेमात' मधील 'खेळ' या कवितेत कवी म्हणतात.

"काय करावे या गावाला
दगडावर डोके आपटावे
की दगडच डोक्यात घालावे" (पृ.क्र. ५९)

येथे दगडावर डोके आपटणे आणि दगड डोक्यात घालणे हे परस्पर वाक्यप्रचार कवींनी वापरले आहेत. तसेच 'भ्रमिष्टांचा जाहिरनामा' व 'पिढीपेस्तर प्यादेमात' या दोन्ही काव्यसंग्रहात अनेक वाक्यप्रचार कवी वापरतात. उदा. मानेवर सुरी चालविणे, नालासाठी घोडा घेणे, अक्कल विकत घेणे, बळी तो कान पिळी, धुतल्या तांदळासारखे राहणे, एरंडाचे गुऱ्हाळ, मांडवाला वेल जाणे, आभाळा एवढं काळीज होणं, झाडा देणे, आवळा घेऊन कोहळा द्यावा. मुळासकट ऊस खाणे, बेडुक उडी मारणे, कशीकरण करता येणे, मूठमारणे इ. वाक्यप्रचार कवींनी कुशलतेने वापरले आहेत.

तसेच पवारांच्या कवितेतून ग्रामीण बोली म्हणींचा वापर केला असल्याचे दिसून येते. उदा. वासरात लंगडी गाय शानी, येरे माझ्यास मागल्या, चोर सोडून सन्याशाला फाशी, ताकाला जाऊन गाडगं लपविणे, अडला नारायण गाढवाचे पाय धरी, देणं कुसळाचं घेणं मुसळाचं इत्यादी.

कवी ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांनी मोठ्या प्रमाणावर म्हणी , वाक्यप्रचार यांचा योग्य वापर केला आहे.

**४.१२) प्रतिमा / प्रतीके :-**

कवी संतोष पवार यांच्या कवितेतील अनुभवविश्व हे ग्रामीण आहे. त्यामुळे कवींनी प्रतिमा - प्रतीके जी वापरली आहेत. ती अस्सल ग्रामीण तसेच लोकबोलीतील आदिम काळातील मिथकांचे उपयोजन कवींनी केले आहे. त्यामुळेच पवारांची कविता वेगळेपणा जपणारी आहे. तसेच त्यांच्या कवितेतील आशय सामाजिक बांधिलकी जपणारा आहे. त्यांच्या कवितेतील -

"पृथ्वीच्या पाठीवर
एका ईश्वराला नसतो दुसऱ्याचा पत्ता
जेरूस्लेमला कळत नाही
कुठल्या दिशेस मक्का
मक्केस कळत नाही
कुठल्या दिशेस काशी
काशीस कळत नाही
वारे कुठल्या दिशेस नालंदा -

- *( भ्रमिष्टाचा जाहीरनामा, पृ. क्र. ४५)*

जाती धर्मातील तेड कवी धर्मपिठातून व्यक्त करताना वेगळी प्रतिमा वापरतात. तसेच लोकबोलीतील मिथकांचे उपयोजन कवीने कुशलतेने केले आहे. उदा. भगीरथ, कृष्णराज, गोरोबाकाकांची आख्यायिका, बळीराजा, वामन, नारद तसेच लोकरामाणातील लोककथांचा वापर कवी करतात. पवार यांची कविता अशा अनेक काल्पनिक प्रतिक-प्रतिमा घेऊन अवतरत असली तरी कवितेतील आशयाशी समरूपता जाणवते. म्हणूनच काव्यातील प्रतिमा विषयी गो. वि. करंदीकर म्हणतात की, "कल्पनेच्या पातळीवर इंद्रियगोचर होऊ शकणारा व जाणिवेने भारलेला कवितेचा प्राथमिक घटक म्हणजे प्रतिमा होय."(करंदीकर,१९८०,१०९) कवितेतील प्रतिमेविषयी करंदीकरांचे मत समर्पकच आहे. पवार

यांच्या कवितेतील प्रतिमा - प्रतीके ही साधी, सोपी व सर्व परिचित अशीच वाटतात. म्हणूनच पवारांच्या कवितेतील प्रतिमांविषयी लीना केदार म्हणतात. "विशिष्ट वाक्यांश, वेगळ्या प्रतिमा, खास ग्रामीण संदर्भातील शब्दांची नवी घडण असे काही विशेष या संग्रहातील भाषेचे जाणवतात. उदा. वासराची गाय तिची बनती मी आई, तशी रंगानं केली बेरंग पोर, जिंदगीचा पतंग, काळजाचा खोपा, हातउसणे, जिरते जसं चामड्यात तेल, निराधारी डोल खात बुढ्यासारखा गाव, खोल आडात चावडीची कोरडी बावडी झाली, चावडी म्हणजे अग्नीडावाची वाट, खाता पुरना न धुता सरना, सगळ्यांचा देव अन आम्हाला भेव, इवलासाक गडू आन् त्याला बघून रडू, जेसीबीनं घालावा थोरल्या झाडाच्या मुळाला खसकन हात तसा उन्मळून मोकळा करुन ठवलाय तुला, कसलं काय देणं कुसळाच आणि घेणं मुसळाचं निघाले, गावची गुरं बाजाराला नेऊन विकली जाऊ नयेत. तसे शेतकरी तोंड घेऊन घरी परत ....., याशिवाय शेतकऱ्यांसाठी 'रानयोगी' असा शब्द घडविणे, कांदाथर्वशीर्ष - यात अथर्वशीर्ष आणि कांद्याचा वांदा याचे एकत्रीकरण करणे, कोलटरी वळणाचे काही संदर्भ येणे. उदा. रक्ताचा खर्डा, संतपरंपरा, लोकगीते परंपरा ते नवकवितेपर्यंतचे सर्व संदर्भ कधी एकमेकांत गुंफून तर कधी स्वतंत्रपणे हाताळणे असे अनेकविध विशेष 'पिढीपेस्तर प्यादेमात' या काव्यसंग्रहाचे विशद करता येतील." (केदार, २०१३, ५) लीना केदार यांचे निरिक्षण योग्यच आहे. पवार यांच्या कवितेतील प्रतीक प्रतिमा या एकूण १९९० नंतरच्या कवितेमध्ये वेगळेपण जपणाऱ्या आहेत.

**४.१३) समारोपः-**

संतोष पद्माकर पवार हे १९८० नंतरचे प्रयोगशील कवी आहेत. त्यांची कविता मराठी साहित्यातील कवितेतील काही ना काही संस्कार घेऊन व्यक्त होते. संतपरंपरेतील ओवी, अभंग तसेच लोकगीतातील लय, बोली भाषेतील अस्सल ग्रामीण शब्दकळा, गद्यात्मक शैली, पंडित साहित्यातील यमक योजना, तसेच म्हणी-वाक्य प्रचारांचा चपखल वापर, समर्पक प्रतीक-प्रतिमांचा वापर व त्याचबरोबर संमिर भाषेचा योग्य वापर इ. विविध

वैशिष्ट्यांनी ही कविता अवतरते. त्यामुळेच संतोष पद्माकर पवार यांच्या कवितेतील वेगळेपणा दिसून येतो.

कवींनी योजलेले प्रत्येक आविष्कार तंत्र अत्यंत परिणामकारक झाले आहे. त्यातून त्यांच्या स्वतंत्र अनुभवाचे, निरीक्षणाचे आणि प्रतिभासामर्थ्याचेही दर्शन घडते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) करंदीकर गो. वि. : 'परंपरा आणि नवता' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती, १९८०.

२) केदार लीना : ***'नवअनुष्टुभ,'*** पिढीपेस्तर प्यादेमात, संतोष पद्माकर पवार 'शेतकरी जीवनाचा आर्त हुंकार, जानेवारी २०१३.

३) चित्रे दिलीप पुरुषोत्तमः ***'भ्रमिष्टाचा जाहीरनामा'*** संतोष पद्माकर पवार, प्रथम आवृत्ती, अभिधानंतर प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट २००४, मलपृष्ठ.

४) मेश्राम केशवः 'अक्षरमर्म' डिंपल पब्लिकेशन वसई,२००५.